पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/०५/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **२३/०५/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे - उपसभापती
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.संतोष बबन कांबळे
६. मा.कलाटे मयुर पांडूरंग
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – सह शहर अभियंता, मा.पुजारी – कार्यकारी अभियंता, मा.तुपसाखरे – उप अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०९/०५/२०१७ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २३/०५/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.विकास डोळस अनुमोदक : मा.संतोष कांबळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५
विषय – पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४ व १२ मी.रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार दि.२७/०६/२०१७ चे सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/०५/२०१७ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/BSUPप्र/१९२/२०१७, दि.१९/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे आणि त्या अनुषंगाने योजनेचे बारकावे समजून घेणेसाठी शासनामार्फत दि.२१/०४/२०१६ व दि.१७/०५/२०१६ रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृहात याविषयी परिसंवाद आयोजित केला होता. त्यामध्ये महानगरपालिके मार्फत मा.आयुक्त, मा.सह. आयुक्त, मा.सह शहर अभियंता BSUP, मा.सहा. आयुक्त झोनिपु, कार्यकारी अभियंता BSUP हे सहभागी झाले होते व त्यासंबंधी प्रस्ताव सादर करणेसाठी शासनाचे मा.श्री. निर्मलकुमार देशमुख, राज्य अभियान संचालक यांनी दि.०३/०२/२०१६ तसेच दि.१३/०४/२०१६ च्या पत्रामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना “सर्वांकरिता घरे २०२२”मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR(Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मागणी सर्व्हेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे.

**या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

१) सदर योजनेमध्ये केंद्रशासनाचे प्रत्येक घरासाठी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाचे र.रु.१ लक्ष इतके अनुदान आहे व उर्वरित ररु५. ७७लाखहिस्सा लाभार्थी यांचा असणार आहे.

२) सदर योजनेमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

३) या योजनेसाठी शहरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांचे अर्ज मागवावयाचे आहेत. ज्या व्यक्तीचे उत्पन्न वार्षिक र.रु.३ लाख आहे तोच लाभार्थी पात्र ठरणार आहे.

४) लाभार्थी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेतील घरे हे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल तर या ठिकाणी कर्ता पुरुष यांच्या नावे घर राहिल.

६) लाभार्थी कुटुंबामध्ये पति / पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

७) अभियान अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांची सहकारी संस्था स्थापन करणेत येईल.

८) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता प्रधानमंत्री आवास योजना, “सर्वांसाठी घरे” – नागरी च्या मार्गदर्शक सूचनानुसार राहील.

सदरची योजना केंद्रशासनाची असून योजनेस केंद्र व राज्य शासनाने सदर योजनेस आर्थिक मदत दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर योजना नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे लागू केली असून त्यामुळे सदर योजनेमध्ये महानगरपालिकेने भाग घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार EWS(Economically Weaker Section) च्या आरक्षित जागांवर घरकूल प्रकल्प राबविणेकरिता DPR बनविणेकामी त्या जागेचा सविस्तर सर्व्हे करणे, इमारत बांधकाम नकाशे तयार करणे, मुलभूत सुविधा (Infrastructure) नियोजन करणे, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पाकरिता पर्यावरण नाहरकत दाखला, शासकीय तसेच निमशासकीय संस्थाकडील नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे, प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी घेणे, निविदा तयार करणे, DPR बनवून तो शासनाकडे सादर करणे, तसेच त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी तसेच अनुदान मिळविणेकामी वेळोवेळी पाठपुरावा करणे व इतर तदनुषंगिक वास्तुविशारद व अभियांत्रिकीविषयक सल्ला इत्यादी आवश्यक कामे करणेकामी सदर क्षेत्रातील अनुभवी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS योजनेच्या घरे बांधणेचे काम करणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँण्ड अर्बन प्लानर यांची नेमणूक केली आहे व त्यांचेमार्फत DPR बनविणेचे काम सुरु आहे.

सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी(EWS) घरे या आरक्षणांतर्गत पुढीलप्रमाणे जागा ताब्यात आलेल्या आहेत.

## तक्ता अ



| अक्र | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं./गट नं. | जागेचे एकुण क्षेत्र हे. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **EWS आरक्षणे** | | | | | | | |
| १ | च-होली | २/८३ | स.नं.४०८पै, ४०९पै | २.१५ | २.१५ | १४४२ | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| २ | रावेत | ४/१०२ | ९६ पै | १.४६ | ० | १०८० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीत मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | १०५पै, १०७ पै, १०८ पै ते ११२ पै | २.०० | १.६५ | ८९६ | ८२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित १७.५०% जागेपैकी ८ गुंठे जागा खाजगी मालकीची असून ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे व उर्वरित क्षेत्र नाल्याचे आहे. |
| ४ | दिघी | २/१२७ | ६६ पै | १.१४ | ० | ८४० | **सरकारी गायरान जमीन**मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीत मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १२८५, १२८७, १२९० | २.०० | १.७२ | १४०० | ८६% जागा ताब्यात आली असून उर्वरित १४% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | २०१पै ते २०५ पै | २.०० | १.२५ | १४०० | ६२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित ३७.५०% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. |
| ७ | चिखली | १/९० | १६५३ पै | २.०० | ० | १४०० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीत मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |

| HDH आरक्षणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पिंपरी | ७७ | १०९पै, | ०.६४ | ०.६४ | ३०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| ९ | पिंपरी | ७९ | ११०पै | ०.४४ | ०.४४ | २०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| १० | आकुर्डी | २८३ | | १.७८ | ०.९५ | ५०० | मनपाच्या अखत्यारितील क्षेत्र ताब्यात आले असून उर्वरित क्षेत्र MIDC च्या ताब्यात आहे. |
| **एकुण** | | | | | | **९४५८** | |

जसजशा जागा ताब्यात येतील तश्या निविदा काढणेत येतील.सदर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २.५ F.S.I. अपेक्षित धरुन घरकुले बांधणेचे नियोजन खालीलप्रमाणे केलेले आहे.

**तक्ता ब**

| अ. क्र . | आरक्षणाचे ठिकाण | संभाव्य घरांची संख्या |
|---|---|---|
| १ | च-होली | १४४२ |
| २ | रावेत | १०८० |
| ३ | डुडुळगांव | ८९६ |
| ४ | दिघी | ८४० |
| ५ | बो-हाडेवाडी | १४०० |
| ६ | वडमुखवाडी | १४०० |
| ७ | चिखली | १४०० |
| ८ | पिंपरी | ३०० |
| ९ | पिंपरी | २०० |
| १० | आकुर्डी | ५०० |
| | **एकुण** | **९४५८घरे** |

अ.क्र. ८ ते १० मधील जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाकडून लवकरच मंजुरी मिळणार असल्याने सदर जागांवर सुद्धा घरे बंधने बाबत नियोजन करणेत येत आहे.

· **प्रकल्पातील इमारतींविषयी ठळक वैशिष्ट्ये**

१) इमारत पार्किंग + १४ मजली (तळ मजला पुर्णपणे पार्किंगसाठी राखीव). इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा

२) दोन लिफ्ट - १.४८ X २.१० मी. (५' X ७')

३) एक स्ट्रेचर लिफ्ट ३.३६ X १.९९ मी. (११' X ६.६')

४) दोन जिने (रुंदी १.५० मी.), जिन्या मध्ये कोटा फरशी.

५) सामाईक पॅसेज (रुंदी १.३५ मी.), Vitrified tiles सुरक्षिततेच्या दृष्टीने १.२ मीटर उंचीची पडदी (Parapet) Oil Paint सह.

६) इमारतीला बाहेरुन Texture Paintव आतून Oil Bound Distemper

७) नियमानुसार आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting).

८) जमिनीखाली व इमारतीवर आवश्यक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या.

९) प्रत्येक इमारतीस सोलर हिटर सुविधा.

१०) इमारतीचे Aluminum Form Work च्या सहाय्याने एकसंध RCC बांधकाम ( Monolithic Construction).

११) पार्किंगमध्ये Trimix पध्दतीचे Flooring.प्रत्येक इमारतीच्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृहासह सोसायटी ऑफीस.

१२) प्रत्येक मजल्यावर १६ सदनिका, प्रत्येक सदनिकेला पुरेसा उजेड, हवेशीर अशी व्यवस्था.

१३) इमारतींचा देखभाल - दुरुस्तीचा कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ३ वर्षे व लिफ्ट ची देखभाल दुरुस्तीचा कालावधी ५ वर्षे राहील.

१४) मलशुध्दीकरण केंद्राचा देखभाल दुरुस्तीचे कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ५ वर्षाचा राहील.

· **इमारतीतील सदनिकेची ठळक वैशिष्ट्ये**

१) केंद्र शासनाच्या नियमानुसार एका सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (Carpet Area) ३० चौ.मी.३२२ चौ.फुट

२) बैठकीची खोली (Hall)– ३.०६ X ३.२ मी. (१०'- १ X १०' – ६'')

३) स्वयंपाक गृह (Kitchen)– २.४९ X १.९८ मी. (८'X ६' – ६'')

४) शयनगृह (Bedroom)– २.७४ X ३.२० मी. (९'X १०' – ६'')

५) स्नानगृह (Bathroom)- १.५२ X १.२० मी. (५'X ४')Wash basin सह, स्नानगृहामध्ये Antiskid ceramic tileflooring,४ फुट उंचीचा Glazed Tileमध्ये Dadoव Oil Paint.

६) शौचालय (W.C.)– १.२० X ०.९१ मी. (४'X ३')ओरीसा पध्दतीचे W.C. पॅन, सिरॅमिक टाईल फ्लोरींगव ४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dadoव ४ फुटाच्या वरील भागास Oil Paint.

७) माळा (Loft)स्वयंपाकगृहामध्ये– ०.६ मी. (२') रुंदी व ०.७५ मी. (२' ६'') उंचीचा.

८) मुख्य दरवाजा व बेडरुम चा दरवाजा - PUF Material मध्ये.

९) स्नानगृह व संडास चा दरवाजा - PVC Material मध्ये.

१०) खिडक्या - Aluminum Slidingव लोखंडी Grill सह.

११) विद्युत तारा– Casingपट्टीमध्ये, PowerPoint, Switches - Anchor कंपनीचे / तत्सम.

१२) Kitchen Otta – Kadappa Platformमध्ये Stainless Steel sink, Platform वर २ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado.

१३) सदनिकेमध्ये आतील भिंतींना सर्वत्र Oil Bound Distemper.

अशा पध्दतीची इमारतीची व सदनिकेची वैशिष्ट्ये राहतील.

प्रत्येक प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) खालीलप्रमाणे:-

**तक्ता क**

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| च-होली | २/८३ | १४४२ | १,१९,३१,७५,६९०.०० |
| रावेत | ४/१०२ | १०८० | ८९,३६,४०,६००.०० |
| डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | ७४,१३,९०,७२०.०० |
| दिघी | २/१२७ | ८४० | ६९,५०,५३,८००.०० |
| बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| वडमुखवाडी | २/३१ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| चिखली | १/९० | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| पिंपरी | ७७ | ३०० | २४,८२,३३,५००.०० |
| पिंपरी | ७९ | २०० | १६,५४,८९,०००.०० |
| आकुर्डी | २८३ | ५०० | ४१,३७,२२,५००.०० |
| | | **खर्च र.रु.** | **७,८२,५९,७४,८१०.००** |

म्हणजेच प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा र.रु.८,२७,४४६/- इतका आहे. यामध्ये प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागेची किंमत, विकास शुल्क, प्रिमिअम शुल्क इत्यादींचा समावेश नाही. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१५१८/- इतका येत आहे.

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिकेने टाकावयाच्या हिश्याऐवजी प्रकल्पास निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणाऱ्या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्यांकडून घेणार नाही. त्या आधारे महानरपालिका अप्रत्यक्षरित्यापुढील तक्ता ड नुसार लाभार्थ्यांना मदत करणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमधील प्रकल्पांचे DPR हे राज्य शासनाच्या SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee) समोर Scrutiny व

Approval साठी सादर केले जाणार आहे. त्यामध्ये DPR Cost मधील DPR Cost व सदनिका खर्चामध्ये बदल होऊ शकते. त्यामुळे लाभार्थ्यांचा हिस्सा हा SLSMC कमिटी मध्ये जो निश्चित करुन दिला जाईल त्यानुसार राहील.

प्रत्येक सदनिकेसाठी रु.१.५ लाख केंद्रशासन, रु.१ लाख राज्य शासन व उर्वरित हिस्सा लाभार्थ्यांकडून घेणेचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या Infra Work,प्रकल्प भाववाढ व प्रकल्पासाठी अनुषंगिक खर्च ही रक्कम महानगरपालिका स्वतः मनपा फंडातून खर्च करेल.

**तक्ता ड**

| अ.क्र. | गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | क्षेत्र (हेक्टर) | प्रशमन शुल्कर.रु. कोटी | सध्याचे रेडी रेकनर नुसार संपादित जमिनीची किंमतर.रु. कोटी | एकुणमनपा हिस्सा र.रु. कोटी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली | २/८३ | १४४२ | २.१५ | ११.५८ | १४.५७ | २६.१५ |
| २ | रावेत | ४/१०२ | १०८० | १.४६ | ११.८८ | ०.०० | ११.८८ |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | २.०० | १०.६८ | ८.१६ | १८.८४ |
| ४ | दिघी | २/१२७ | ८४० | १.१४ | ६.३७ | ०.०० | ६.३७ |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | २.०० | ११.७३ | १३.०० | २४.७३ |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | १४०० | २.०० | ११.०२ | ७.६८ | १८.७ |
| ७ | चिखली | १/९० | १४०० | २.०० | १२.१४ | ०.०० | १२.१४ |
| ८ | पिंपरी | ७७ | ३०० | ०.६४ | ३.९७ | ५.९७ | ९.९४ |
| ९ | पिंपरी | ७९ | २०० | ०.४४ | २.८२ | ४.१० | ६.९२ |
| १० | आकुर्डी | २८३ | ५०० | १.७८ | ७.९८ | ७.३६ | १५.३४ |
| **एकुणखर्चर.रु. कोटी** | | | | | **९०.१७** | **६०.८४** | **१५१.०१** |

प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम करताना केंद्रशासन, राज्यशासन व लाभार्थी यांचेकडून हिस्सा घेऊन काम करणेत येईल. परंतू प्रकल्प पूर्ण होणेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च, शासन व लाभार्थी एकुण हिस्सा यामधील फरक व प्रकल्पाचे बांधकाम परवानगीचे छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रशमन शुल्क, अधिमुल्य यांची रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून गृहित धरणेत येईल.त्यामुळे सदर प्रकल्पासाठी बांधकाम परवानगीचे सर्व शुल्क माफ करणेचे प्रस्तावित आहे.

SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee)निश्चित केलेला लाभार्थी यांचा स्वहिस्सा पुढीलप्रमाणे जमा करणेत येईल. त्यामध्ये सोडतीमध्ये (Lucky Draw)नाव आल्यानंतर पहिला हप्ता २०%रक्कम, दुसरा हप्ता ४०% रक्कम हा इमारतीचे काम ५०% झाल्यानंतर व तिसरा हप्ता ४०% रकमेचा भरणा ताबा मिळण्यापूर्वी मनपाकडे करणे आवश्यक आहे. सदरची सदनिका मनपा मार्फत बांधून लाभार्थ्यांना त्यांचा हिस्सा भरुन घेतलेनंतर ९९ वर्षाच्या Lease ने देणेत येतील. लाभार्थ्यांना मिळकत कर, वीज बिलइ. बिले स्वतः भरावी

लागतील. प्रत्येक इमारतीची सोसायटी स्वतंत्र करणेत येईल व सोसायटीमार्फत सामाईक वीज बिल, सामाईक पाणी बिलभरावे लागेल.

महानगरपालिका ज्याप्रमाणे मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, दिवा बत्ती, ड्रेनेज, मलशुध्दीकरण केंद्र (STP), घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management)इत्यादी मुलभूत सुविधा (Infrastructure) स्वखर्चाने करते त्याप्रमाणे या प्रकल्पातही महानगरपालिकेने स्वखर्चाने करावे असे वाटते. या सुविधा MPCB पर्यावरण खात्याच्या नियमानुसार करणे आवश्यक आहे.

त्या मुलभूत सुविधांचा खर्च खालीलप्रमाणे :-

**तक्ता इ**

| अक्र | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत | रस्ते | पावसाळी गटर व Rain water harvesting | पा.पु. | ड्रेनेज | मलशुध्दी करण केंद्र (STP) | घनकचरा व्यवस्थापन S.W.M | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्व आकडे लक्ष मध्ये** | | | | | | | | | | |
| १ | च-होली | २७.९२ | २३२.८६ | ९३.८८ | १२.६१ | ४३.३२ | १५१.१५ | १. | २३३.४७ | ७९६.२१ |
| २ | रावेत | २०.९१ | १७४.४ | ७०.३२ | ९.४४ | ३२.४४ | ११३.२१ | ०.७५ | १७४.८६ | ५९६.३३ |
| ३ | डुडुळगांव | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ४ | दिघी | ९.५५ | ६५. | २८.३ | ७.५ | २७. | ६५. | ०.५५ | १२५. | ३२७.९ |
| ५ | बो-हाडेवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ६ | वडमुखवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ७ | चिखली | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ८ | पिंपरी | ७.५ | १०. | १२. ५० | ५.५ | २२. | ३५. | ०.४५ | ०.३५ | ८०.८ |
| ९ | पिंपरी | ५.५ | ८. | ९.२५ | ४.५ | १८. | ३०. | ०.४ | ०.३ | ७५.९५ |
| १० | आकुर्डी | २३.१२ | १२५. | ७८.३२ | १३.५ | ३६.२३ | ११९. | ०.७८ | १८२. | ५७७.९५ |
| **एकुण** | | | | | | | | | **र.रु.लक्ष** | **४४३४.१** |

एकंदरीत वरील सर्व ठिकाणी मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी रु.४४३४. १० लक्ष इतका खर्च येईल. सदर प्रकल्पातील इमारतींचे काम सुरु झालेनंतर मुलभूत सुविधा (Infrastructure) करिता निविदा काढण्यात येतील.

सदर प्रकल्पासाठी खालील बाबींची मंजूरी आवश्यक आहे.

१) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता
२) बांधकाम परवानगी
३) पर्यावरण खात्याकडील नाहरकत दाखला (Environmental Clearance Certificate)
४) राज्य शासनाच्या "केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती"(CSMC)ची मान्यता

प्रशासकीय मान्यतेनंतर बांधकाम परवानगी साठी व पर्यावरण व ईतर दाखल्यासाठी अर्ज दाखल करणेत येईल. प्रस्तावास मनपाची मान्यता मिळालेनंतर सदर योजना म्हाडा मार्फत राज्य शासनाच्या "केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती"(CSMC)ची मान्यता घेवून प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामांच्या सर्व निविदा काढणेत येतील.

**पंतप्रधान आवास योजनेकरिता**प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**तक्ता ई**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ७,८२,५९,७४,८१० |
| २ | ५% Contingencies सह | ८,२१,७२,७३,५५१ |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | ८,३८,१६,१९,०२२ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ४६,९५,५८,४८९ |
| **एकुण (३ + ४)** | | ८,८५,११,७७,५१० |
| **Say एकुणरु.** | | **८८५.१२कोटी** |

महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविणे (Infra) कामांचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता –फ**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ४४,३४,१०,००० |
| २ | ५% Contingencies | ४६,५५,८०,५०० |
| ३ | २% Work charges establishment | ४७,४८,९२,११० |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | २,६६,०४,६०० |
| **एकुण (३ + ४)** | | **५०,१४,९६,७१०** |
| **Say एकुणरु.** | | **५०. १५कोटी** |

**तक्ता - ई** नुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ९४५८ सदनिका बांधणेकामी **रु.रु.८८५.१२कोटी**चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी **तक्ता – फ** नुसार येणा-या **रु.रु.५०.१५ कोटी** चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सागर बाळासाहेब गवळी )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८२३/२०१७
दिनांक : २६/०५/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc